**<u>एल.आर.एम.ए. नं. ५५/२०२२ मधिल भुसंपादन जमिन अर्ज नं. ३/२०१७ प्रमाणे मोबदला रक्कम मिळणेकामी दाखल केलेला अर्जावरील निशाणी क. १ वरील आदेश</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी भुसंपादन अर्ज क्र. ३/२०१७ मध्ये मंजूर केलेली असून त्या आदेशाप्रमाणे नुकसान भरपाई रक्कम मिळण्याकरीता सादर केलेला आहे.

**२.** अर्जदार यांचे असे कथन आहे की, भुसंपदान अर्ज क्र. ३/२०१७ मधील मिळकत ही शासनाने संपादीत केली असून त्यामधील रक्कम **<u>रू. ६५,६२,८००/—</u>** सामनेवाले यांनी या न्यायालयात 'क' रजिष्टर क्र. ५१ अन्वये दि. १५/०६/२०२० रोजी जमा करण्यात आलेली आहे व सदर रक्कम न्यायालयाने मुदत ठेवीमध्ये ठेवण्यात आली होती. सदर मुदत ठेव मोडल्यानंतर ती रक्कम व्याजासह **<u>रूपये ६८,१०,३७७/—</u>** या न्यायालयात 'क' रजिष्टर क्र. ५६९ अन्वये दि. ०९/०१/२०२३ रोजी जमा करण्यात आलेली आहे. सदर रक्कम त्यांना अदा करण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

**३.** सदर अर्जावर सहा. अधिक्षक (वित्त), दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर, नाशिक यांनी सादर केलेले दि. ०९.०१.२०२३ च्या अहवालाचे अवलोकन केले असता सदर रक्कम **रू. ६८,१०,३७७/— ही न्यायालयात 'क' रजिष्टर क्र. ५६९ अन्वये** दि. ०९.०१.२०२३ रोजी जमा असल्याचे दिसते. सामनेवाले नं. १ यांनी त्यांच्या जबाबात असे नमुद केले आहे की, या प्रकरणात अपील दाखल असल्यास त्या बाबतचा संबंधीत सहा. अधिक्षकांचा अहवाल मागविण्यात यावा तसेच अर्जदाराने या प्रकरणात यापूर्वी मोबदला घेतलेला नाही असे प्रतिज्ञापत्र घ्यावे आणि त्याचप्रमाणे भुसंपादन संस्थेचा अहवाल घेवून आदेश पारीत करण्यात यावेत. तसेच अर्जदार यांना नुकसान भरपाई रक्कम अदा करावयाची झाल्यास त्यांचेकडून बॅक गॅरंटी घेण्यात यावी.

**४.** संबंधीत अधीक्षक/रीट क्लर्क यांनी रिपोर्ट सादर केला आहे की, सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालयाचे अपिलाबाबत नोंद आढळून येत असल्याचे सांगितले आहे. परंतु सदर प्रकरणात स्थगिती आहे किंवा नाही याबाबत खुलासा दिलेला नाही. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील **दिवाणी चौकशी अर्ज क्र.**

**१२०६/२०१९ सह पहिले अपिल क्र. ११२६/२०१९** ची प्रत सादर केलेली आहे. सदर दिवाणी चौकशी अर्जाचा निकाल दि. ०४/०४/२०१९ रोजी झालेला असून त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने सामनेवाले यांना स्थगिती दिली असून नुकसान भरपाईची रक्कम दि. २०/०७/२०१९ पावेतो भरण्याचे आदेशीत केले होते व सदर रक्कम त्यांनी दि. २०/०७/२०१९ पावेतो न भरल्यास सदर दिवाणी चौकशी अर्ज निकाली निघून स्थगिती आदेश रद्द होईल असे नमूद करण्यात आलेले आहे. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे सामनेवाले यांनी नुकसान भरपाईची रक्कम दि. १५/०६/२०२० रोजी न्यायालयात भरल्याचे दिसून येते. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश रद्द झालेले आहे. अर्जदाराने त्याच्या प्रतिज्ञापत्रात असे नमुद केले आहे की त्यांनी या प्रकरणात याआधी रक्कम स्विकारलेली नाही. तसेच अर्जदाराने ना. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांचे सदर प्रकरणात स्थगिती आदेश नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे.

**५.** अर्जदाराने या जमिन निर्देशन अर्जातील ॲवार्डची साक्षांकित प्रत दाखल केलेली आहे. सदर अवार्डनुसार अर्जदाराला या प्रकरणात नुकसान भरपाईची रक्कम देण्याचा हुकूम न्यायालयाने केलेला आहे.

**६.** रिट क्लर्क यांच्या अहवालानुसार सदर निकालाविरूध्द सामनेवाले यांनी मा. उच्च न्यायालयात अर्ज दाखल केला होता व सदर अर्ज दि. ०४/०४/२०१९ रोजी निकाली झालेला आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने सामनेवाले यांना स्थगिती दिली असून नुकसान भरपाईची रक्कम दि. २०/०७/२०१९ पावेतो भरण्याचे आदेशीत केले होते व सदर रक्कम त्यांनी दि. २०/०७/२०१९ पावेतो न भरल्यास सदर दिवाणी चौकशी अर्ज निकाली निघून स्थगिती आदेश रद्द होईल असे आदेशीत करण्यात आले होते. सदर प्रकरणात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशाप्रमाणे सामनेवाले यांनी नुकसान भरपाईची रक्कम दि. १५/०६/२०२० रोजी न्यायालयात भरल्याचे दिसून येते. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने दिलेले स्थगिती आदेश रद्द झालेले आहे. त्यानंतर सामनेवाले यांनी त्यावर अपिल केले आहे किंवा नाही याचा अद्याप पावेतो बोध होत नाही. याठिकाणी अर्जदारांची जमीन ही संपादीत झालेली आहे ही बाब वादातीत नाही. अशा परिस्थितीत संपादीत झालेल्या जमिनीचा मोबदला

रक्कम मिळण्यास अर्जदार निश्चितच पात्र आहेत. अर्जदाराने या प्रकरणात याआधी रक्कम स्विकारलेली नाही असे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. या प्रकरणात स्थगिती आदेश आढळून येत नाही मात्र तरीही भविष्यात मा. उच्च न्यायालय अथवा मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेशीत केल्यास सदर रक्कम न्यायालयात जमा करण्याचा हमी बॉण्ड सादर करणे आवश्यक आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे—

## आदेश

**(१)** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**(२)** सहा. अधिक्षक (वित्त) यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार या प्रकरणात जमा असलेली भुसपांदन मोबदल्याची रक्कम **रू. ६८,१०,३७७/—** अर्जात नमुद अर्जदारांना त्यांची ओळख शाबीत केल्यानंतर त्याचे बॅन्क खात्यावर अदा करण्यात यावी.

**(३)** अर्जदाराला असे आदेशीत करण्यात येते की, सामनेवाले यांनी मा. उच्च न्यायालय अथवा मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले असल्यास सदर अपीलातील आदेशाव्दारे अर्जदारांना रक्कम परत करण्याचा आदेश झाल्यास, अर्जदार हे सदर रक्कम न्यायालयात भरणा करतील असा हमी बॉण्ड न्यायालयास सादर करावा.

**( र. श्री. करंकाळ )**
**दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर**
**नाशिक.**

**दि. ११.०१.२०२३.**